पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक : २३/७/२०२६

पुणे महानगरपालिका
✷ सूचना ✷
(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ठ भाग २ मधील
नियम क्रं.१(डी) (एच) व (आय) अन्वये)
कार्यपत्रिका क्रमांक – ६
(खास सभा)

मा.विशाल धनवडे, मा.रूपाली धाडवे, मा.सुहास टिंगरे, मा.अमोल बालवडकर,मा.वैशाली बनकर, मा.निशा मानवतकर, व मा.रत्नमाला सातव या स्थायी समितीच्या ७ (सात) मा.सभासदांकडून दिनांक २३/७/२०२६ रोजी लेखी मागणी (रिक्वीझिशन) आल्यावरुन पुणे महानगरपालिकेची विशेष (खास) सभा बुधवार, दिनांक २९/७/२०२६ रोजी दुपारी ३=०० (तीन) वाजता हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

विषय क्र. १३६

संदर्भ:– मा.महा.आयुक्त यांचे जावक क्रमांक मआ/पर्यावरण/३१७, दि.२३/७/२०२६ चे पत्र.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्र.५९) कलम ६७(अ) अन्वये पुणे शहरातील **सन २०२५ – २०२६** च्या पर्यावरण सद्यस्थिती दर्शक अहवाल सादर करणेबाबत.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर पुणे ४११००५
दिनांक :– २३/७/२०२६

मा.महापौर यांचे आज्ञेवरुन

योगिता भोसले
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका

(टिप :–प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)